वाचले:- १) श्री. मारुती महेंद्र आसवले व इतर २ तर्फे कु.मु.धा. मे. एसव्हीबी रियालटी प्रा.लि. तर्फे श्री. श्रेणिक विनय बलाई व इतर १, रा. कोथरुड, पुणे, यांचा मा. महानगर आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरण पुणे यांचे कार्यालयाकडे केलेला दिनांक-२१/०६/२०१८ रोजीचा अर्ज.

२) मा. पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचे कार्यालयाकडील पत्र क्र.बीएमए/मौ.टाकवे बु./ग.नं.६०० व इ./ प्र.क्र.४०५/१७३, दि.०४/०७/२०१८.

३) महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग यांचेकडील परिपत्रक क्र. एनएए-२०१७/प्र.क्र.११५/टी-१ दिनांक - १९ ऑगस्ट २०१७.

४) महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग यांचेकडील महाराष्ट्र अध्यादेश क्र. २ दि.५/०१/२०१७.

---

जमिनीचा वर्ग, तिचा भोगवटा, तिचा धारणाधिकार, अकृषिक आकारणी आणि ती वरील भार याबाबत पत्र

(महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ४२क)

जिल्हाधिकारी कार्यालय पुणे
(महसूल शाखा)
क्र. Maval/NA/SR/७८/२०१८
पुणे दि. ११/०९/२०१८.

प्रति,

मा. महानगर आयुक्त, तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे (PMRDA)
स.नं.१५२-१५३, महाराजा सयाजीराव गायकवाड उद्योग भवन औंध- पुणे

विषय:- मौजे टाकवे बु., ता. मावळ, जि. पुणे येथील जमीन ग.नं.६०० पै., ६०१ पै., ६०३ पै., ६०४, ६०५, ६०७ पै.,६०८, व ६०९ मधील एकुण ४०१८७.०० चौ.मी. क्षेत्रापैकी वनीकरणाचे २६२९.९६ चौ.मी. क्षेत्र आणि रस्तारुंदीने बाधित होणारे १३०९.१८ चौ. मी. व २६३२.७१ चौ. मी. असे एकुण ६५७१.८५ चौ.मी. क्षेत्र वजा जाता उर्वरीत ३३६१५.१५ चौ.मी. क्षेत्रास निवासी रेखांकन भुखंड (लेआऊट) प्रयोजनासाठी महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ४२ क नुसार जमिनीचे रूपांतरणाबद्दल अकृषिक आकारणी व शासकीय देणी कळविण्याबाबत...
संदर्भ :- आपले कार्यालयाकडील पत्र क्र. बीएमए/मौ.टाकवे बु./ग.नं.६०० व इ./ प्र.क्र.४०५/१७३, दि.०४/०७/२०१८.

महोदय,

मौजे टाकवे बु., ता. मावळ, जि. पुणे येथील जमीन ग.नं.६०० पै., ६०१ पै., ६०३ पै., ६०४, ६०५, ६०७ पै.,६०८, व ६०९ मधील एकुण ४०१८७.०० चौ.मी. क्षेत्रापैकी वनीकरणाचे २६२९.९६ चौ.मी. क्षेत्र आणि रस्तारुंदीने बाधित होणारे १३०९.१८ चौ. मी. व २६३२.७१ चौ. मी. असे एकुण ६५७१.८५ चौ.मी. क्षेत्र वजा जाता उर्वरीत ३३६१५.१५ चौ.मी. क्षेत्रास निवासी रेखांकन भुखंड (लेआऊट) प्रयोजनासाठी महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १८ नुसार रेखांकन/बांधकाम परवानगी मिळणेबाबत अर्जदार **श्री. मारुती महेंद्र आसवले व इतर २ तर्फे कु.मु.धा. मे. एसव्हीबी रियालटी प्रा.लि. तर्फे श्री. श्रेणिक विनय बलाई व इतर १, रा. कोथरुड, पुणे** यांनी आपले कार्यालयाकडे दिनांक-२१/०६/२०१६ रोजी दाखल केलेला अर्ज या कार्यालयाकडे दि.१७/०७/२०१८ रोजी दाखल केलेला आहे.

२. महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग यांचेकडील शासन परिपत्रक क्र. एनएए-२०१७/ प्र.क्र.११५ / टी-१ दिनांक- १९/०८/२०१७ मधील तरतूदींनुसार आपलेकडील पत्र क्र. बीएमए/मौ.चिखलसे/ ग.नं. २२/

प्र.क्र.२३८३/९६९, दि.२८/०९/२०१७ अन्वये सदर जमिनीच्या संदर्भातील भोगवटा / धारणाधिकार / अधिभार /अकृषिक आकारणी व इतर शासकीय देणी या मुद्दयांची माहिती मिळणेकामी प्रस्तुतचा प्रस्ताव व त्यालगतची कागदपत्रे या कार्यालयाकडे सादर केलेली आहेत.

३. त्यानुसार महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग यांचेकडील शासन परिपत्रक क्र. एनएए-२०१७ / प्र.क्र. ११५/टी-१ दिनांक- १९/०८/२०१७ मधील तरतूदींनुसार शासन परिपत्रकातील परिच्छेद क्र. (I) (२) (i) मधील (अ) ते (इ) मध्ये नमुद मुद्यांचे अनुषंगाने खालीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे.

४. मौजे टाकवे बु., ता. मावळ, जि. पुणे येथील जमीन ग.नं.६०० पै., ६०१ पै., ६०३ पै., ६०४, ६०५, ६०७ पै.,६०८, व ६०९ मधील **एकुण ४०१८७.०० चौ.मी.** क्षेत्रापैकी वनीकरणाचे २६२९.९६ चौ.मी. क्षेत्र आणि रस्तारुंदीने बाधित होणारे १३०९.१८ चौ. मी. व २६३२.७१ चौ. मी. असे एकुण ६५७१.८५ चौ.मी. क्षेत्र वजा जाता उर्वरीत **३३६१५.१५ चौ.मी.** क्षेत्रास निवासी रेखांकन भुखंड (लेआऊट) प्रयोजनासाठीचे क्षेत्राच्या खालील वर्णनाची जमीन जमिन मालक यांचे हक्कनोंदणीस दाखल आहे.

| अ.क्र | जमिन मालकाचे नाव | ग.नं. | ७/१२ नुसार क्षेत्र | बिनशेती सारा आकारणकामी रेखांकनात प्रस्तावित केलेले क्षेत्र (चौ.मी) |
|---|---|---|---|---|
| १ | मारुती महादु असवले | ६०० | ४०००.०० | ४०००.०० |
| २ | मारुती महादू असवले | ६०१ पै., | ३४६८०.०० | २४४८७.०० |
| ३ | रणजीत मारुती असवले | ६०३ पै., | ५००.०० | ३००.०० |
| ४ | अविनाश मारुती असवले | ६०४ | १०००.०० | १०००.०० |
| ५ | | ६०५ | ६००.०० | ६००.०० |
| ६ | | ६०७ | १६००.०० | १६००.०० |
| ७ | | ६०८ | ३७५०.०० | ३७५०.०० |
| ८ | | ६०९ | ५२३०.०० | ५०१२.०० |
| ९ | एकुण | | ५१३८०.०० | ४०९६७.०० |
| १० | अर्जदार यांचे सादर केलेल्या नियोजित नकाशानुसार समाविष्ट केलेले एकुण क्षेत्र | | | ४०१८७.०० चौ. मी. |
| ११ | (-) वनीकरणाने बाधित होणारे क्षेत्र. | | | २६२९.९६ चौ. मी. |
| १२ | (-) रस्ता रुंदीने बाधीत होणारे क्षेत्र | | | १३०९.१८ चौ. मी. |
| १३ | (-) रस्ता रुंदीने बाधीत होणारे क्षेत्र | | | २६३२.७१ चौ. मी.. |
| १४ | (-) एकुण वजावट केलेले क्षेत्र | | | ६५७१.८५ चौ.मी. |
| १५ | अकृषिक आकारण करावयाचे शिल्लक क्षेत्र | | | ३३६१५.१५ चौ. मी. |
| १६ | वापरात बदलाचे प्रयोजन | | | निवासी |

१) विषयांकीत जमीन ग.नं.६००, ६०१, ६०३, ६०४, ६०५, ६०७, ६०८, ही भोगवटादार-१ ची आहे. (तहसिलदार मावळ यांचेकडील आदेश क्र. कु.का/४३/एसआर/९६/२०१५, दि.०६/०६/२०१५ अन्वये ग.नं. ६०४, ६०५, व ६०८ या कुळाने दाखल झालेली नवीन शर्त शेरा कमी करण्यात आलेला आहे.)

२) विषयांकीत जमीन स.नं.२६५/५ त्याचा ग.नं.६००, स.नं.२६५/१ त्याचा ग.नं.६०१, स.नं.२६५/४ त्याचा ग.नं.६०३, स.नं.२६५/३ त्याचा ग.नं.६०४, स.नं.२६५/७ त्याचा ग.नं.६०५, स.नं. २६५/९ त्याचा ग.नं.६०७, स.नं.२६५/१० त्याचा ग.नं.६०८, व स.नं.२६५/११ त्याचा ग.नं.६०९ असा असुन सन १९५५-

५६ पासूनचे ७/१२ उतारे व फेरफार व या कार्यालयातील ॲलिनेशन रजिस्टर पाहता सदर जमीनी कोणत्याही इनाम/ वतनाची नाही.

३) विषयांकीत जमीनीच्या ७/१२ चे इतर हक्कात गट नं. ६०१ चे इतर हक्कात असलेले बोजे अर्जदार यांचेशी संबंध नाही. त्याबाबत टाकवे बु., विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था, मर्यादित यांचे कर्ज बाकी नसलेचा दाखला सादर केलेला आहे.

४) प्रस्तुत नियोजनामधील ग. नं. ६०९ या मधील ० हे. ७.३० आर क्षेत्राची खरेदी दस्त क्र.१४०/२०१७, दि. १०/०१/२०१७ झालेली असून, त्याचा फेरफार ३३७८ मंजूर होऊन त्यानुसार ७/१२ तशी दुरुस्ती नोंद घेवून रेखांकन नकाशे मंजूरी देण्यास हरकतीचे नाही.

५) सन १९५० पासूनचे ७/१२ उतारें व त्यावरील फेरफार नोंद यावरुन सदरची जमिन खाजगी/सरकारी वनसंवर्गात मोडत नाही.

६) प्रस्तुत जमीन कुळकायदा संवर्गातील नाही.

७) प्रस्तुत जमिनीचा देय असलेला रुपांतरण कर, अकृषिक सारा तसेच यथास्थिती नजराणा किंवा अधिमुल्य आणि इतर शासकीय देणी खालीलप्रमाणे आहेत. तरी शासन परिपत्रक दिनांक- १९/०८/२०१७ मधील परिच्छेद क्र. (I) (२) (ii) मध्ये नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करावी.

८) प्रस्तुत मौजे टाकवे बु., ता. मावळ, जि. पुणे येथील जमीन ग.नं.६०० पै., ६०१ पै., ६०३ पै., ६०४, ६०५, ६०७ पै.,६०८, व ६०९ मधील एकुण ४०१८७.०० चौ.मी. क्षेत्रापैकी वनीकरणाचे २६२९.९६ चौ.मी. क्षेत्र आणि रस्तारुंदीने बाधित होणारे १३०९.१८ चौ. मी. व २६३२.७१ चौ. मी. असे एकुण ६५७१.८५ चौ.मी. क्षेत्र वज़ा जाता उर्वरीत ३३६१५.१५ चौ.मी. क्षेत्रास निवासी रेखांकन भुखंड (लेआऊट) वापराचे रुपांतरण अकृषिक आकारणी खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | तपशील | आकारणी |
|---|---|---|
| १ | बिगरशेती आकारणीचे प्रयोजन | निवासी रेखांकन भुखंड (लेआऊट) |
| २ | बिगरशेती आकारणी क्षेत्र (चौ.मी.) | ३३६१५.१५ चौ. मी. |
| ३ | बिनशेती आकारणीचा दर (प्रति चौ.मी.) | रु ०.१० पैसे |
| ४ | बिनशेती करावयाच्या क्षेत्रावरील वार्षिक आकारणी | ३३६२.०० |
| ५ | रुपांतरीत कराची आकारणी | १६८१०.०० |
| ६ | जिल्हा परिषद कर | २३५३४.०० |
| ७ | ग्रामपंचायत कर | ३३६२.०० |
| ८ | वसूल करावयाची एकूण रक्कम रुपये | ४७०६८.०० |

अकृषिक आकारणी तसेच यथास्थिती नजराणा किंवा अधिमुल्य शासन देय रकमा जमा करण्याचे विहित लेखाशिर्ष :- **Land and Revenue**
**Non Agricultural Assessment**
००२९१७४६०१

नागरी कमाल जमिन धारणा कायद्यांतर्गत असलेल्या केसेस (यु.एल.सी.), कुलमुख्त्यारपत्र, वनजमीन, मोजणी नकाशा, जागा पाहणी, विद्युतवाहीनी, भुसंपादन, पर्यावरण विभाग ना-हरकत (Environment Clearance), एअर फोर्स, रेडझोन परिक्षेत्र (वर्क्स ऑफ डिफेन्स ॲक्ट) उदा. देहु ॲम्युनेशन डेपो, दिघी मॅगेझिन, उच्च ऊर्जा पदार्थ अनुसंधान प्रयोगशाळा (HEMRL), INS शिवाजी, राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी

(NDA), पर्यावरण संवेदनशिल असलेली गांवे (ESA) इ. बाबींची खात्री नियोजन प्राधिकारी म्हणुन आपले स्तरावर करुनच रेखांकन/बांधकाम नकाशांना परवानगी देणे अपेक्षित आहे.

वरीलप्रमाणे विषयांकीत जमिनीचा वर्ग, तिचा भोगवटा, तिचा धारणाधिकार, ती वरील अधिभार रुपांतरण कर, अकृषिक आकारणी तसेच यथास्थिती नजराणा किंवा अधिमुल्य आणि इतर शासकीय देणी याबाबतची वस्तुनिष्ठ माहिती सादर करण्यात येत आहे. तरी विषयांकीत जमिनीवरील रेखांकन/बांधकाम आराखडयांना उपरोक्त नमुद बाबींच्या पडताळणी अंती मंजूरी देण्याबाबत शासन परिपत्रक दिनांक- १९/०८/२०१७ मधील परिच्छेद क्र. (I) (२) (ii) मध्ये नमुद केलेप्रमाणे आपले स्तरावर विहित मुदतीत पुढील योग्य ती कार्यवाही करावी.

आपला विश्वासु,

मा. जिल्हाधिकारीसो.
यांचे मान्यतेने

(प्रल्हाद हिरामणी)
तहसिलदार महसूल
जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे

प्रत :- श्री. मारुती महेंद्र आसवले व इतर २ तर्फे कु.मु.धा.
मे. एसव्हीबी रियालटी प्रा.लि. तर्फे
श्री. श्रेणिक विनय बलाई व इतर १, रा. कोथरुड, पुणे.

शासन परिपत्रक दिनांक- १९/०८/२०१७ मधील परिच्छेद क्र. (I) (२) (iv) मध्ये नमुद केलेप्रमाणे पुणे महानगर विकास क्षेत्र प्राधिकरण यांनी त्यांचे स्तरावर रेखांकन/बांधकाम नकाशांना परवानगी दिलेनंतर शासनास देय रकमा विहित लेखाशिर्षाखाली भरल्या संदर्भातील चलनाची प्रत व रेखांकन/बांधकाम परवानगीची साक्षांकीत प्रत या कार्यालयाकडे सादर करावी. जेणेकरुन प्रस्तुत जमिनीच्या गा.न.नं. ७/१२ मध्ये जमिन अकृषिक झाल्याची नोंद घेणेकामी पुढील आवश्यक ती कार्यवाही करता येईल.

(प्रल्हाद हिरामणी)
तहसिलदार महसूल
जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे